# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. ७२-७३

( विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन कालावधीतील बैठका )

**दिनांक : ४ जुलै ते ६ जुलै २०२१**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| ७२ | ४ जुलै (रविवार) | सह्याद्री अतिथीगृह, मुंबई | **१५** |
| ७३ | ६ जुलै | विधानभवन, मुंबई | **0** |
| | | **एकूण** | **१५** |

(विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन- कालावधी- २ दिवस : दि. ५ ते ६ जुलै २०२१)

# मंत्रिमंडळ निर्णय
# ४ जुलै (रविवार)
# ( एकूण निर्णय-१५ )

पर्यावरण विभाग

**महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ ला मंजूरी**

महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण २०२१ ला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. या प्रस्तावित धोरणाचा कार्यकाळ २०२१ ते २०२५ असा असणार असून या काळात इलेक्ट्रीक वाहनांच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी विविध पाऊले उचलण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रात शाश्वत आणि प्रदूषणरहित वाहनांचा अंगीकार करुन इलेक्ट्रीक वाहनाच्या वापरात आपले राज्य देशात अग्रेसर बनविण्यासाठी. तसेच भारतात वाहन उत्पादनातील महाराष्ट्राचे आघाडीचे स्थान कायम राखणे आणि इलेक्ट्रीक वाहन आणि त्यासंबंधित घटक याकरिता जागतिक पातळीवर एक प्रमुख उत्पादनक आणि गुंतवणुक केंद्रस्थान म्हणून उदयास येणे हे या धोरणाचे लक्ष्य आहे.

धोरणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सन २०२५ पर्यंत नवीन वाहन नोंदणीत १० टक्के हिस्सा बॅटरी इलेक्ट्रिक वाहनाचा असेल. राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती या ६ लक्ष्यित शहरी समुहांमध्ये सन २०२५ पर्यंत सार्वजनिक वाहतुकीच २५ टक्के विद्युतीकरण साध्य करण्यात येणार आहे. तसेच २०२५ पर्यंत ७ शहरांमध्ये (मुंबई , पुणे , नागपूर , औरंगाबाद, नाशिक, अमरावती व सोलापूर) २५०० आणि किमान ४ मुख्य महामार्गावर (मुंबई- पुणे, मुंबई- नाशिक, पुणे- नाशिक, मुंबई- नागपूर) २५०० ठिकाणी सार्वजनिक व निम सार्वजनिक चार्जिंग सुविधांची उभारणीचे उद्दीष्ट आहे. तसेच एप्रिल २०२२ पासून, मुख्य शहरांतर्गत परिचालित होणारी सर्व नवीन शासकीय वाहने (मालकीची/भाडे तत्वावरील) ही इलेक्ट्रिक वाहने असतील.

धोरणांतर्गत राज्यात वाहनांना मूलभूत मागणी प्रोत्साहन, नोंदणी सूट, आश्वासित बायबॅक, वाहन मोडित काढण्यासाठी प्रोत्साहने देण्यात येणार आहेत. तसेच पायाभूत चार्जिंग सुविधा निर्मितीसाठी सवलती, उत्पादन क्षेत्र प्रोत्साहन योजना, बिगर वित्तीय प्रोत्साहने दिली जाणार आहेत.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग

## शासकीय सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये सर्व संवर्गांसाठी रिक्त पदाच्या ४ टक्के पदे आरक्षित

दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार राज्य शासकीय सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-अ व गट ब मधील नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांवर पदोन्नतीमध्ये दिव्यांगयांच्या “अ”, "ब" व "क" या प्रकारांसाठी प्रत्येकी १ टक्के आरक्षण व “ड” व “इ” या प्रकारांसाठी १ टक्के आरक्षण याप्रमाणे एकूण ४ टक्के आरक्षण लागू करण्यास मान्यता देण्यात आली. पदोन्नतीमध्ये दिव्यांग आरक्षण लागू करताना, विहित दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गांसाठी रिक्त पदाच्या ४ टक्के पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित राहतील.

हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचनांच्या आणि उच्च न्यायालयात प्रलंबित रिट याचिका क्र. ६८१९/२०२१ व इतर याचिका यांमध्ये होणाऱ्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून घेण्यात आला आहे.

-----०-----

सामाजिक न्याय विभाग

## भूमिहिन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना राबविण्यास मंत्रिमंडळाची मान्यता

राज्यातील अनुसूचित जमातीच्या दारिद्ररेषेखालील भुमिहिन कुटुंबाना कसण्यासाठी जमिन उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत "भूमिहिन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना राबविण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

आदिवासी विकास विभागाकडून २००४-०५ पासून ही "भूमिहिन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभीमान योजना राबविण्यात येते. आजच्या निर्णयानुसार ही योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या "कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येणार आहे. त्यानुसार या योजनेअंतर्गत भूमिहीन आदिवासी कुटुंबांना ४ एकरापर्यंत कोरडवाहू जमिन प्रति एकर ५ लाख आणि २ एकरापर्यंत बायागती जमिन प्रति एकर ८ लाख या कमाल दराने उपलब्ध करून देण्यार असून ही योजना १०० टक्के शासन अनुदानित तत्वावर राबविण्यात येणार आहे. तसेच या योजनेअंतर्गत २० टक्क्याच्या पटीत १०० टक्क्यांपर्यंत म्हणजेच रेडीरेकनरच्या दुपटीपर्यंत किंमत वाढविण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस देण्यात आले आहेत. ही योजना अनुसूचित जमातीच्या दारिद्ररेषेखालील

भूमिहीन कुटुंबासाठी असून या योजनेअंतर्गत प्रामुख्याने दारिद्रयरेषेखालील भूमिहिन आदिवासी परित्यक्त्या स्त्रीया, दारिद्रयरेषेखालील भूमिहिन आदिवासी विधवा स्त्रीया, भुमिहिन कुमारी माता, भूमिहिन आदिम जमाती, भूमिहिन पारधी यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

-----०-----

उद्योग विभाग

## शासकीय कार्यालयांना वारंवार लागणाऱ्या १८५ वस्तु राज्यांतर्गत स्थापित सुक्ष्म व लघु उद्योगांकडून घेण्याचा निर्णय

राज्यात मोठ्या प्रमाणात उत्पादन होणाऱ्या व शासकीय विभागास वारंवार लागणाऱ्या १८५ वस्तू पुर्णतः राज्यांतर्गत स्थापित सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी आरक्षित ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

कोव्हिड १९ या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर राज्यांतर्गत सुक्ष्म व लघू उत्पादन उद्योगांना आत्मनिर्भर करून प्रोत्साहन व चालना देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या उद्योगांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध देण्याकरीता शासकीय विभागांतर्गत होणाऱ्या खरेदी धोरणात राज्यातील सुक्ष्म व लघू उद्योजकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. त्याअंतर्गत राज्याच्या उद्योग विभागाच्या १ डिसेंबर २०१६ रोजीच्या सुधारीत खरेदी धोरणानुसार सुक्ष्म व लघु उद्योगांकरीता आरक्षित केलेल्या २४१ वस्तूंपैकी राज्यात निर्माण होणाऱ्या १८५ वस्तूंची खरेदी केवळ पुर्णतः राज्यात स्थापित सुक्ष्म व लघु उद्योग घटकांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

तसेच उर्वरित ५६ वस्तू ज्या देशातील कोणत्याही सुक्ष्म व लघु उत्पादकाने निर्माण केलेल्या वस्तुंच्या खरेदी संदर्भात निविदा प्रक्रियेत जर महाराष्ट्रातील व राज्याबाहेरील स्थापित सुक्ष्म व लघु उद्योआंगानी भाग घेतला असेल व राज्याबाहेरील उद्योजक न्युनतम बोलीधारक एल-१ असेल तर, एल-१ दराने राज्यांतर्गत स्थापित विषयांकित निविदेत भाग घेतलेल्या सुक्ष्म व लघु उद्योगांना ५०% पुरवठा करणेबाबत त्यांची सहमती असल्यास देण्यात येईल.

-----०-----

पणन विभाग

## पणन महासंघास वित्त विभागाने वेळोवेळी मंजूर केलेल्या शासन हमींवरील हमीशुल्क माफ करण्याचा निर्णय

पणन महासंघास वित्त विभागाने वेळोवेळी मंजूर केलेल्या शासन हमींवरील हमीशुल्क माफ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

हंगाम २०१६-१७ मध्ये बाजार हस्तक्षेप योजना व हंगाम २०१७-१८ मध्ये नाफेडच्यावतीने हमीभावाने कडधान्य व तेलबिया (मुग, उडीद, सोयाबीन, तूर व हरभरा) खरेदीअंतर्गत शेतकऱ्यांचे चुकारे देण्यासाठी, तसेच हंगाम २०१७ १८ मध्ये NEML पोर्टलवर ऑनलाईनद्वारे नोंदणी केलेल्या परंतु ज्या शेतकऱ्यांची तूर व हरभरा हमीभावाने खरेदी करता आला नाही, अशा नोंदणीकृत शेतकऱ्यांना १ हजार रुपये प्रति क्विंटल याप्रमाणे अर्थसहाय्य देण्यासाठी पणन महासंघास वित्त विभागाने वेळोवेळी शासन हमी मंजूर केलेली होती. या शासन हमीवरील ३१ मार्च २०२१ अखेरचे प्रलंबित ५३.१४ कोटी रुपयांचे हमीशुल्क या निर्णयानुसार माफ करण्यात आले.

तसेच यापुढे ज्या ज्या संस्थांना शासन हमी मंजूर केली जाईल, त्या संस्थांच्या संबंधित विभागांनी शासन हमीवरील हमीशुल्काची रक्कम अदा करण्यासाठी अर्थसंकल्पिय तरतूद करावी, असा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

-----o-----

ऊर्जा विभाग

## महावितरणच्या कृषीपंप वीजजोडणीसाठीच्या उच्चदाब वितरण प्रणाली योजनेची

राज्यात महावितरण कंपनीमार्फत कृषीपंप वीजजोडणी देण्याकरिता सुरु असलेल्या उच्चदाब वितरण प्रणाली योजनेची मुदत दि.३१ मार्च २०२३ पर्यंत वाढविण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

उच्चदाब वितरण प्रणाली योजना ०५ मे २०१८च्या शासन निर्णयानुसार राज्यात राबविणे सुरु आहे. या योजनेंतर्गत ३१ मार्च २०१८ पर्यंत पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप अर्जदारांकरिता राज्यात राबविण्यात येत आहे. ही योजना प्रत्यक्ष ऑक्टोबर, २०१८ पासून कार्यान्वित होईपर्यंत विविध योजनांमधून कृषीपंप वीज जोडण्या देण्यात आल्या होत्या. त्यामुळे ही योजना २.२४ लाख अर्जदारांपैकी १.६७ लाख अर्जदारांकरिता सिमित झाली.

उच्चदाब वितरण प्रणाली योजना ही मुळ योजना ५०४८.१३ कोटी इतकी मंजूर होती. आता ही योजना ४७३४.६१ कोटी इतकी झाली आहे. तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या वर्गवारीतील लाभार्थ्यांच्या प्रस्तावित संख्येत प्रत्यक्ष सर्वेक्षणाअंती घट आढळल्याने महावितरण कंपनीकडे शिल्लक असलेली अनुदानाची उर्वरित रक्कम उर्वरित राज्यातील या योजनेअंतर्गत

लाभार्थ्यांकरिता तसेच ०१ एप्रिल २०१८ नंतर पैसे भरुन वीज जोडण्याकरिता प्रलंबित असणाऱ्या अनुसूचित जाती व जमाती वर्गवारीतील लाभार्थ्यांकरिता खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे विदर्भ व मराठवाडा विभागातील अनुसूचित जाती व जमाती वर्गवारीतील लाभार्थ्यांची संख्या प्रत्यक्षात कमी आढळल्याने सर्वसाधारण लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्याने शासनाकडून महावितरण कंपनीस देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये रुपये ७८०.७३ कोटी इतकी वाढ झाली आहे. ही अतिरिक्त वाढीव खर्च अनुदान स्वरुपात महावितरण कंपनीस देण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

सामाजिक न्याय विभाग

## कैकाडी जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यासंदर्भात ठराव एकमताने विधिमंडळात संमत

विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा याप्रमाणेच उर्वरित राज्यातील कैकाडी जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे पाठविण्यासंदर्भातील ठराव आज विधानसभा व विधानपरिषदेत एकमताने मंजूर करण्यात आला.

विधानसभा व विधानपरिषदेत सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी हा ठराव मांडला. श्री. मुंडे म्हणाले की, महाराष्ट्रात अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा यामध्ये कैकाडी जातीचा अनुसूचित जातीमध्ये तर उर्वरित ठिकाणी कैकाडी जातीचा विमुक्त जाती (अ) मध्ये समावेश केलेला आहे. महाराष्ट्र राज्यात कैकाडी जातीचा समावेश दोन वेगवेगळ्या प्रवर्गात होत असल्यामुळे या समाजाला विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने समाजातील सदस्यांनी, लोकप्रतिनिधींनी राज्यातील सर्व कैकाडी जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याची मागणी केलेली आहे. या मागणीनुसार, कैकाडी समाजाला अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्यासंदर्भातील प्रस्ताव विधीमंडळात मांडण्यात येत आहे.

हा ठराव एकमताने दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आला.

-----०-----

## नोंदणीकृत हॉटेल व्यावसायिकांना वाणिज्यिक वीज दर व औद्योगिक वीज दरातील फरकाची रक्कम परतावा स्वरूपात देणार

आदरातिथ्य क्षेत्रास उद्योगाचा दर्जा दिल्याने नोंदणीकृत हॉटेल व्यावसायिकांकडून विद्युत बिलाची आकारणी वाणिज्यिक दराऐवजी औद्योगिक दराने केल्यामुळे येणाऱ्या फरकाची रक्कम केंद्र किंवा राज्य शासनाकडे नोंदणीकृत हॉटेल व्यावसायिकांना देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांना १ एप्रिल २०२१ पासून वीजदर आणि वीज शुल्क औद्योगिक दराने लागू करण्यात येत आहे. त्यामुळे संबधित हॉटेल व्यावसायिकांना वीज बिलाच्या फरकाची रक्कम देण्यात येणार आहे. तसेच राज्य शासनाकडे नोंदणीकृत हॉटेल्सच्या बाबत महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशानंतर याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यासंदर्भात महाराष्ट्र वीज वितरण कंपनीकडून मध्यावधी आढाव्यासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल करण्यात यावी.

केंद्र शासनाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांना वाणिज्यिक वीज दर व औद्योगिक वीज दर यामधील फरकाची रक्कम परतावा स्वरुपात देण्यासाठी १०० कोटीची तरतूद करण्यास देखील यावेळी मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे निवास न्याहारी योजनेअंतर्गत परवानाधारकांकडून घरगुती दराने वीज दर व शुल्क आकारणी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्रीमंडळाकडून या बैठकीत देण्यात आले.

-----०-----

सामान्य प्रशासन विभाग

## शासकीय सेवेतील गट अ व गट ब मधील राजपत्रित पदांच्या पदोन्नत्यांच्या प्रस्तावांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घ्यावी लागणार नाही

राज्य शासकीय सेवेतील गट अ व गट ब मधील राजपत्रित पदांच्या पदोन्नत्यांच्या प्रस्तावांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याची बाब महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे पदोन्नत्यांच्या प्रस्तावांना लोकसेवा आयोगाची परवानगी घ्यावी लागणार नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने पदोन्नतीच्या मार्गदर्शक तत्वांचे निकष अंतिम करण्यात आलेले असल्याने व या मार्गदर्शक तत्त्वातील निकषानुसारच पदोन्नती देण्यात येणार आहेत. त्यामुळे या निकषानुसार पदोन्नती देण्याचे संवर्ग निहाय प्रत्येक प्रस्ताव पुन्हा आयोगास सादर करण्याची आवश्यकता नसल्याने, राज्य शासकीय सेवेतील गट-अ व गट ब मधील पदांवर द्यावयाच्या पदोन्नतीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांची वैयक्तिक योग्यतेविषयीच्या प्रस्तावास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेणे ही बाब वगळण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----o-----

कृषि विभाग

## मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेसाठी कर्ज घेण्यास आणि त्यासाठी त्रिपक्षीय करार करण्यास मान्यता

राज्यातील अवर्षण प्रवण क्षेत्र, शेतकरी आत्महत्या ग्रस्त जिल्हे व नक्षलग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचनाकरित पूरक अनुदान देण्यासाठी मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना राबविण्यात येत आहे. या पूरक अनुदानाकरिता निधी उभारण्यासाठी Dedicated Micro Irrigation Fund (DMIF) अंतर्गत कर्ज घेण्यास व त्यासाठी त्रिपक्षीय करार करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयानुसार मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षातील सुक्ष्म सिंचन संचासाठी पूरक अनुदानाची रक्कम अदा करण्यासाठी नाबार्ड कडून ५३३.१५ कोटी कर्ज DMIF अंतर्गत घेण्यास मंजूरी देण्यात आली आहे. हे कर्ज घेण्यासाठी नाबार्ड व केंद्र शासनाच्या कृषी सहकार व शेतकरी कल्याण विभागासोबत त्रिपक्षीय करार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे, केंद्र शासनाने DMIF १४ व्या वित्त आयोगानंतरही चालु ठेवल्यास, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मान्यता समितीच्या (SLSC) मान्यतेने मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचनासाठी पूरक अनुदान देण्याकरिता आवश्यक असणाऱ्या निधीसाठी मंत्रीमंडळाच्या मान्यतेने DMIF अंतर्गत कर्ज उभारण्यास मान्यता देण्यात येईल.

-----o-----

अल्पसंख्यांक विकास विभाग

## उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहांमध्ये प्रवेशित अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या आहारासाठीची रक्कम थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा होणार

राज्यातील अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (मुले/मुली) बांधण्यात आलेल्या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या (मुले/मुली) आहारासाठीची रक्कम थेट त्यांच्या आधार संलग्न बैंक खात्यात जमा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

या योजनेंतर्गत वसतिगृहांमध्ये प्रवेश घेणाऱ्या ८ लाखापर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या खात्यावर भोजन भत्त्याची ही रक्कम जमा करण्यात येणार आहे. अ, ब, क व ड वर्ग महानगरपालिका, विभागीय शहरातील वसतिगृहांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना दरमहा ३५०० प्रमाणे दहा महिन्यांचे ३५ हजार दोन टप्प्यात आणि जिल्हा व तालुकास्तरावरील सर्व वसतिगृहातील विद्यार्थ्यांना ३ हजाराप्रमाणे दहा महिन्यांसाठी ३० हजार दोन टप्प्यात दिले जाणार आहे.

-----o-----

ग्रामविकास विभाग

## नागरिकांच्या मागास प्रवर्गासंदर्भातील माहिती मिळण्यासंदर्भात केंद्राला शिफारस

राज्य मागासवर्ग आयोगास सुलभ संदर्भाकरिता आवश्यक असणारी सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ मधील नागरीकांच्या मागास प्रवर्गाची जातीनिहाय सर्व माहिती केंद्र शासनाकडे उपलब्ध आहे. ही माहिती त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशी शिफारस विधिमंडळाने केंद्र शासनाकडे केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनिय १९५९ मध्ये नागरिकांच्या मागास प्रवर्गाची पदे आरक्षित ठेवण्याकरीता राज्य मागासवर्गीय आयोग गठीत करण्यात आला आहे. या आयोगास सुलभ संदर्भाकरिता आवश्यक असणारी सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ मधील नागरिकांच्या मागास प्रवर्गाची जातीनिहाय सर्व माहिती केंद्र शासनाकडे उपलब्ध आहे. असे असतांना राज्य शासनाने वारंवार विनंती करुनही केंद्र शासनाने ही माहिती अद्याप उपलब्ध करुन दिलेली नाही. यामुळे मागासवर्ग आयोगास इम्पेरिकल डेटा उपलब्ध करून देण्यास अडचण येत आहेत. याकरिता केंद्र शासनाकडून राज्य शासनास नागरिकांच्या मागास प्रवर्गाची सर्व माहिती (इम्पेरिकल डाटा) त्वरीत उपलब्ध करून द्यावी, अशी शिफारस विधानसभा आणि विधानपरिषदेने सोमवारी (दि.५) केंद्र शासनाला केली आहे.

-----o-----

## केंद्र शासनाच्या ३ कृषी कायद्यामध्ये महाराष्ट्र राज्याची सुधारणा शेतकऱ्यांच्या हिताला बाधा पोहचू देणार नाही

“शेतकऱ्यांचे उत्पादन व्यापार आणि व्यवहार प्रोत्साहन आणि सुविधा) अधिनियम, २०२० ", “शेतकरी (सक्षमीकरण आणि संरक्षण) आश्वासीत किंमत आणि शेती सेवा करार अधिनियम, २०२०", "अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम, २०२०" हे दोन अधिनियम अनुक्रमे कृषि विभाग व अन्न व नागरी पुरवठा विभागाशी संबंधीत आहेत. या तीन केंद्रीय कायद्यांमध्ये सुधारणा करून विधेयके मांडण्यात आली आहेत. राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताला बाधा पोहचेल असे कुठलेही निर्णय आम्ही घेणार आहेत.

सुधारित विधेयकात खालीलप्रमाणे अतिशय महत्वाच्या सुधारणा करण्यात आल्या आहेत

१. “शेतकऱ्यांचे उत्पादन व्यापार आणि व्यवहार प्रोत्साहन आणि सुविधा) अधिनियम, २०२० "

मोठे भांडवलदार व कॉर्पोरेट रिटेलर्सतर्फे शेतकऱ्यांची फसवणूक व छळ होण्याची दाट शक्यता लक्षात घेऊन राज्यांतर्गत व आंतरराज्य अनुसूचित शेतमालाचा व्यापार किंवा व्यवहार करण्यासाठी व्यापाऱ्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडून लायसन घेणे बंधनकारक असेल.

- शेतकरी आणि व्यापारी यांच्यामधील वाद सोडविण्यासाठी नजीकच्या अपील अधिकाऱ्याकडे अपील करता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.
- एखाद्या व्यापाऱ्याने शेतकऱ्यांची छळवणूक केली तर गुन्हा सिध्द झाल्यास त्यांना तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा पाच लाख रुपयांपेक्षा कमी नसेल इतका दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- तसेच शेतकऱ्याच्या छळ याची परिभाषा करुन जेव्हा खरेदी-विक्रीच्या करारानुसार किंवा शेतकऱ्याचा मालाची पोच मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत पैसे दिले गेले नाही तर तो छळा चा गुन्हा म्हणून नोंदविला जाईल अशी तरतूद करण्यात आलेली आहे.
- राज्य शासनाला राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे सदर कायद्यातील तरतूदींबाबत नियम करण्याचे अधिकार असतील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

२. "शेतकरी (सक्षमीकरण आणि संरक्षण) आश्वासीत किंमत आणि शेती सेवा करार अधिनियम, २०२०:

- शेतकऱ्याच्या तक्रारीचा निपटारा तात्काळ होण्यासाठी अपिलीय अधिकारी व सक्षम अधिकारी यांची व्याख्या करण्यात आली असून त्यानुसार मूळ केंद्र शासनाच्या कायद्यात असलेल्या उपविभागीय अधिकारी ऐवजी राज्य शासन ठरवेल अशा सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येणार
- केंद्र शासनाच्या कायद्यामध्ये किमान आधारभूत किमतीची (MSP) ही तरतूद नाही. MSP ची तरतूद या सुधारणमध्ये करण्यात आलेली आहे.

- शेतकरी व करार करणारी कंपनी (पुरस्कर्ता) यांच्यात परस्पर संमतीने पीक विक्री किंवा खरेदी यासाठीचा करार किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी किंमतीने दोन वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येईल.

३. अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम, २०२०

- केंद्र सरकार जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत युध्द, दुष्काळ, असाधारण किंमत वाढ व गंभीर स्वरुपाची नैसर्गिक आपत्ती अशा असाधारण परिस्थितीमध्येच कडधान्ये, डाळी, बटाटा, कांदे, खाद्य तेलबिया व खाद्यतेल इत्यादींचे नियमन करु शकणार आहे.
- सदर वस्तूवर साठा निर्बंध लावण्याबाबत असाधारण किंमतवाढ या एकमेव आधारवरच निर्णय घेण्यात येणार आहे.
- यात राज्य शासनास कोणतेही अधिकार देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे जीवनावश्यक वस्तू अधिनियमातील उपरोक्त जीवनावश्यक वस्तूंचे नियमन तसेच जीवनावश्यक वस्तूंवर साठा निर्बंध लावण्याचे अधिकार केंद्र शासनासह राज्य शासनासही असतील, अशी सुधारणा राज्य शासनाकडून या विधेयकाद्वारे प्रस्तावित.

-----०-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

**बारामती येथे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, त्यांस संलग्नित आयुर्वेद रूग्णालय सुरु करण्याचा मान्यता**

पुणे जिल्ह्यातील बारामती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व त्यांस संलग्नित १०० रुग्णखाटांचे आयुर्वेद रूग्णालय केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर सुरू करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग जनतेला आरोग्य सेवा अत्यंत प्रभावी व परिणामकारकपणे देण्यासाठी कार्य करत आहे. त्यानुषंगाने राज्यातील आरोग्य सेवेतील आवश्यकता लक्षात घेऊन बारामती येथे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित १०० रुग्णखाटांचे आयुर्वेद रुग्णालय स्थापन करण्यात येणार आहे. त्याप्रमाणेच प्रस्तावित केल्याप्रमाणे शासन मान्यतेने वेळोवेळी आवश्यक तेवढी पदनिर्मिती करण्यास आणि पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तावित शासकीय आयुर्वेद महाविद्यालयासाठी एकूण अंदाजित रुपये ३००.७८५ (अनावर्ती खर्च रुपये १८५.३२ कोटी व पहिल्या पाच वर्षाकरिता आवर्ती खर्च रुपये ११५.४६५ कोटी) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच, पाचव्या वर्षाप्रमाणे आवश्यक आवर्ती खर्चासाठी प्रति वर्षी सुमारे रूपये ३०.२८५ कोटी इतका निधी उपलब्ध करून त्याप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

विधि व न्याय विभाग

**शिर्डी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था नियम व अनुसूचिमध्ये बदलास मान्यता**

शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संस्थेच्या नियम २०१३ मधील नियम ५(ज) व अनुसूचि मध्ये बदल करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) नियम, २०१३ मधील नियम ५ (ज) वगळण्यास व अनुसूचि मधील अ.कृ.१ ते ५ मध्ये सुधारणा करण्यास या निर्णयानुसार परवानगी देण्यात आली.

-----o-----

## मंत्रिमंडळ निर्णय
## ६ जुलै (रविवार)
## ( एकूण निर्णय-० )

निर्णय नाही

-----o-----